जळगाव तरुण भारत
30 Jul 2025 - Page 8
epaper.tarunbharatlive.com

नागेश्वर मंदिर असून या ठिकाणी महाराष्ट्रभरातून अनेक भक्त दर्शनासाठी येतात व आपल्या मनोकामना पूर्ण करत असतात. वर्षातून चार वेळेस याठिकाणी यात्रा भरत असते, असे सांगण्यात आले.



# पिंपळकोठा येथे अंगणवाडीसेविकांना दिले सायबर सुरक्षेचे धडे

**पिंपळकोठा (ता. एरंडोल) :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची विद्यार्थिनी नेहा पाटील आणि जान्हवी सपकाळे यांनी एरंडोल तालुक्यातील अंगणवाडीसेविकांना सायबर गुन्हे कशाप्रकारे घडतात, त्यापासून आपण कसं सावध रहावे या विषयावर मार्गदर्शन केले. त्यामध्ये ओटीपी फ्रॉड, फेक वेबसाइट्स, अनोळखी नंबरवरून येणारे व्हिडिओ कॉल, फोटो मॉर्फिंग, आदी फ्रॉड कशाप्रकारे घडतात त्यामध्ये आपली फसवणूक कशाप्रकारे होऊ शकते आणि काही केस स्टडीजदेखील थोडक्यात सांगितल्या. महिलांना असलेले प्रश्न सोडवण्यात आले. या सत्रासाठी विखरण अंगणवाडीसेविका कल्पना पाटील, संगीता महाजन आणि छाया पाटील यांचे सहकार्य लाभले. तसेच महाराष्ट्र सायबर सेल पोलीस, राजू आमले, शिक्षक समन्वयक, क्विक हील फाउंडेशन पुणे येथील गायत्री केसकर, साक्षी पाटील, दीपूसिंग यांचे मार्गदर्शन लाभले.